# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## वसुंधरा दिवसानिमित्त सिताबर्डी इंटरचेंज येथे १००० स्क्वेअर फूट भव्य आकर्षक रांगोळी

## कलाकारांनी केवळ ५ तासात साकारली रांगोळी




नागपूर : २२ एप्रिल हा वसुंधरा दिवस म्हणून साजरा केला जातो. याच दिवसाच्या निमित्ताने नागपूर मेट्रोच्या सिताबर्डी इंटरचेंज येथे १००० स्क्वेअर फूट एवढी भव्य रांगोळी काढण्यात आली आहे. संस्कार भारती तर्फे साकार झालेली हि रांगोळी पर्यावरण सुरक्षेचा संदेश देते. ही रांगोळी साकार करायला संस्कार भारतीचे ५० कलाकार सलग ५ तास झटले. ही रांगोळी साकार करायला कलाकारांना ४० किलो पांढरी रांगोळी आणि ४०-५० किलो गुलाल लागला. मेट्रो प्रवाश्यांना २५ एप्रिल पर्यंत हि रांगोळी बघता येईल. संस्कार भारती तर्फे मंत्री श्री मनोज यांनी नागरिकांना निवेदन केले आहे की सगळ्यांनी रांगोळी बघून त्याचा आनंद घ्यावा.

दर वर्षी २२ एप्रिल वसुंधरा दिवस म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण रक्षणा संबंधी जण सामन्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न या निमित्ताने केला जातो.२२ एप्रिल १९७० रोजी हा दिवस सगळ्यात पहिल्यांदा साजरा करण्यात आला आणि त्यानंतर दर वर्षी जगात सर्वत्र या दिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.